नगर परिषद/नगर पंचायती सार्वत्रिक निवडणुका-
२०१६-१७
महत्वाचे राजकीय पुढारी (Star Campaigner)
यांच्या प्रचाराबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. ४१ /का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५ ऑक्टोबर, २०१६.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व राजकीय पक्ष (राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले)

विषय:- नगर परिषद/नगर पंचायती सार्वत्रिक निवडणुका-२०१६-१७
महत्वाचे राजकीय पुढारी (Star Campaigner) यांच्या प्रचाराबाबत...

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३४/का-६, दिनांक-१७ ऑक्टोबर, २०१६ अन्वये राज्यातील २१२ नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम निर्गमित केला आहे. या निवडणूक कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी दिनांक २४/१०/२०१६ रोजी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची बैठक घेतली.

२. या बैठकीमध्ये उपस्थित राजकीय पक्षांनी राज्यामध्ये फार मोठया प्रमाणात नगरपरिषदेच्या/नगरपंचायतींच्या निवडणुका असल्याने स्टार प्रचारकांच्या बाबतीत खालीलप्रमाणे राज्य निवडणूक आयोगास विनंती केली.

(i) महत्वाचे राजकीय पुढारी यांची यादी संबंधित जिल्हाधिकारी यांना निवडणुकीचा कार्यक्रम प्रसिध्द केल्यापासून सात दिवसांच्या आतमध्ये सादर करण्याऐवजी नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, अशी तरतूद करावी.

(ii) स्टार प्रचारकांची संख्या वाढवावी.

३. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का-५, दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११ अन्वये महत्वाचे राजकीय पुढारी (Star Campaigner) यांची यादी करणे, स्टार प्रचारकांची संख्या आणि उमेदवारांनी करावयाच्या निवडणूक खर्चाच्या मर्यादेतून त्यांच्या प्रचार दौऱ्याच्या प्रवास खर्चास सूट देणे इत्यादीबाबत तरतूद करण्यात आली आहे.

४. सर्व राजकीय पक्षांची विनंती ध्यानी घेता यासंदर्भात राज्य निवडणूक आयोग येत्या नगरपरिषद/नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

५. **आदेश**

५.१ राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या सर्व राजकीय पक्षांना नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका-२०१६-१७ करिता "महत्वाच्या राजकीय व्यक्तींची/प्रचारकांची (Star Campaigner)" संख्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

(अ) भारत निवडणूक आयोगाकडून मान्यताप्राप्त (राष्ट्रीय, राज्यस्तरीय व इतर राज्यस्तरीय एकूण १४ पक्ष) यांच्याकरिता - ४०

(ब) इतर पक्ष - २०

५.२ राजकीय पक्षांना ही यादी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या प्रथम दिवसापासून ७ दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक राहील. मात्र, संपूर्ण राज्यातील सर्व नगरपरिषदा/नगरपंचायतींकरिता ही संख्या यथास्थिती ४०/२० पेक्षा जास्त संख्या असणार नाही.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(स्वाक्षरी)

( ध. मा. कानेड )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग